महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U४०१०९MH२००५SGC१५३६४५
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.३४८/२४८४
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

दिनांक. २९.०१.२०२१

# परिपत्रक

**विषय: दिनांक ३० जानेवारी, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळुन हा दिवस "हुतात्मा दिन" म्हणून पाळण्याबाबत.**

**संदर्भ: महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.जपूति-२२२१/प्र.क्र.०९/२९ दि.२८ जानेवारी, २०२१.**

.......

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्याकरिता दिनांक ३० जानेवारी रोजी दरवर्षी संपूर्ण देशभर दोन मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी परिपत्रक क्र.जपूति-२२२१/प्र.क्र.०९/२९ दिनांक २८ जानेवारी, २०२१ अन्वये शनिवार दिनांक ३०.०१.२०२१ रोजी हुतात्मा दिन पाळण्याबाबतच्या सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर परिपत्रकाची प्रत सोबत जोडण्यात येते आहे.

२. सर्व संबंधीतांना विनंती करण्यात येते की, हुतात्म्यांना आदरांजली गंभीरपणे व योग्य त्या आदराने मौन (स्तब्धता) पाळून उपरोक्त नमूद दिनांक २८.०१.२०२१ च्या परिपत्रकातील सूचनांचे अवलोकन करून शनिवारी दिनांक ३०.०१.२०२१ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता सर्व कार्यालयांमध्ये हुतात्मा दिन पाळण्यात यावा. तसेच सर्व संबंधीतांनी या बाबतच्या सूचना तंतोतंत पाळण्यात येतील याबाबतची दक्षता घ्यावी.

३. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत: वरीलप्रमाणे

(राजेंद्र पांडे)
महाव्यवस्थापक (मासं-मासंव्यप्र)

C:\Users\Administrator\Desktop\F-348 Hutatma Din 2021.docx29-Jan-21

**दिनांक ३० जानेवारी, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता दोन मिनिटे मौन ( स्तब्धता ) पाळून हा दिवस " हुतात्मा दिन" म्हणून पाळण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : जपुती२२२१/प्र.क्र.९/२९**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २८ जानेवारी, २०२१

<u>वाचा</u> :- केंद्र शासनाच्या गृह विभागाच्या क्र.२/१/२०२१-Public, दिनांक १८ .०१.२०२१ चे पत्र.

## <u>प रि प त्र क</u>

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दिनांक ३० जानेवारी रोजी दरवर्षी संपूर्ण देशभर दोन मिनिटे मौन (स्तब्धता ) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात येते. त्यानुसार यावर्षीही शनिवार, दिनांक ३० जानेवारी,२०२१ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता दोन मिनिटे मौन (स्तब्धता ) पाळून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात यावा. शनिवार, दिनांक ३० जानेवारी, २०२१ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पाळण्यात यावयाच्या मौन (स्तब्धता ) ची सुरुवात होण्यापूर्वी सकाळी ठिक १०.५९ पासून ११.०० वाजेपर्यन्त इशारा भोंगा वाजविण्यात येईल. सदर इशारा भोंगा संपल्यानंतर सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/ आस्थापना/ शैक्षणिक संस्था/विद्यापीठे या मधील अधिकारी/कर्मचारी/ शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी /विद्यार्थी तसेच नागरिक आदी सर्वांनी दोन मिनिटे मौन (स्तब्धता ) पाळावे, सकाळी ठिक ११.०२ मिनिटांनी मौन ( स्तब्धता ) संपल्यासंबंधीचा इशारा भोंगा सकाळी ठिक ११.०३ मिनिटांपर्यन्त वाजविण्यात येईल.

२. जेथे भोंग्याची व्यवस्था नसेल तेथे वरीलप्रमाणे सकाळी ठिक ११.०० वाजता मौन (स्तब्धता) पाळण्याबाबत योग्य ते निदेश संबंधितांना देण्यात यावेत व हुतात्म्यांना आदरांजली गंभीरपणे व योग्य त्या आदराने मौन (स्तब्धता ) पाळून देण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२१०१२८१६५११५८१२०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

LALIT NAMDEO SADAFULE

Digitally signed by LALIT NAMDEO SADAFULE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=49d0b6bfb0d78bba142b040bbfdee534c7aa6db30b0e4d3a918f d1d910da93a1, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=7bf3e1eac0ab4a8c9144c78ea332ce94c22440c2d337ab611 9823044b2d0a3ab, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
cn=LALIT NAMDEO SADAFULE
Date: 2021.01.28 17:29:02 +05'30'

( ल. ना. सदाफुले)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई,

५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
६. सर्व मा. अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. अपर मुख्य सचिव , शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
११. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१२. आयुक्त, मुंबई महानगरपालिका, मुंबई
१३. सर्व विभागीय आयुक्त
१४. सर्व जिल्हाधिकारी
१५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
१६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१७. पोलीस आयुक्त, मुंबई/पुणे/नागपूर/ठाणे /औरंगाबाद/ नवी मुंबई/सोलापूर/नाशिक
१८. सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक
१९. जनरल ऑफीसर कमांडींग, महाराष्ट्र / गुजरात राज्य, मुंबई
२०. एअर ऑफीसर कमांडींग, मेरी टाईम्स एअर ऑपरेशन, महाराष्ट्र
२१. फ्लॅग ऑफीसर कमांडींग, इन चीफ वेस्टर्न कमांड, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई
२२. महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे/ मध्य रेल्वे, मुंबई
२३. कमांडर जनरल होमगार्ड, मुंबई
२४. सचिव, मुंबई पोर्ट ट्रस्ट, मुंबई
२५. कंट्रोलिंग ऑफिसर, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल, सांताक्रुझ विमानतळ, मुंबई
२६. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर
२७. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई
२८. प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
२९. प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
३०. संचालक, ऑल इंडिया रेडिओ, मुंबई
३१. संचालक, नागरी संरक्षण संचालनालय, जुने सचिवालय, विस्तार, एम.जी.रोड, फोर्ट, मुंबई-३२
<u>त्यांनी या परिपत्रकान्वये इशारा भोंगा वाजविण्याबाबत उचित कार्यवाही करावी, अशी विनंती आहे.</u>
३२. संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई
३३. डेप्युटी प्रिन्सिपॉल, इन्फॉर्मेशन ब्युरो, भारत सरकार, मुंबई
३४. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
३५. अधिपरिक्षक, पुस्तके व प्रकाशने, मुंबई
३६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (त्यांना विनंती की, या कार्यक्रमास दूरदर्शन, आकाशवाणी व वृत्तपत्रे इत्यादी प्रसार माध्यमांद्वारे प्रसिध्दी देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करावी)
३७. निवड नस्ती (सामान्य प्रशासन विभाग / कार्यासन २९).